| | | |
|---|---|---|
| | पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई<br>वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई<br>Email ID–ps.paydhunie.mum@mahapolice.gov.in<br>/ Phone – 022 23473333/23471785 | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


# प्रेस नोट

दिनांक : ३०/०४/२०२४

**Online माध्यामाद्वारे महिलांना लग्नाचे आमिष दाखवून, विश्वास संपादन करून, फसवणूक करणारा सराईत गुन्हेगार इम्रानअली फैजअली खान यास जेरबंद केले बाबत.**

---

माहे मे २०२३ ते माहे आक्टोंबर २०२३ या कालावधीत आरोपी नामे इम्रानअली फैजअली खान, रा.ठि. हैद्राबाद, आंध्रप्रदेश याने फिर्यादी महिला यांना **Online** माध्यमाव्दवारे संपर्क करुन लग्नाचे आमिष दाखवुन विश्वास संपादन केला. तसेच खोटी कारणे सांगून वेळोवेळी पैशाची मागणी करुन २१,७३,५०२/- रुपये रोख/पेटीएम/ एन.ई.एफ.टी या माध्यमातून घेतले व ते फिर्यादी यांना परत केले नाहीत. याप्रकारे आर्थिक व मानसिक फसवणुक केलेबाबत फिर्यादी यांनी तक्रार केल्यामुळे पायधुनी पोलीस ठाणे येथे आरोपी इम्रानअली फैजअली खान विरुध्द गु.र.क्र. १७६/२४ कलम ४०६, ४२० भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हयातील आरोपीत इसम हा वारंवार त्याचे राहते ठिकाण बदलत असल्याने व तो पोलीसांचे लक्ष विचलित करीत असल्याने तो मिळून येत नव्हता. गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पायधुनी पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुन्हयाचा तांत्रिक पुराव्याचे विश्लेषण करून त्या आधारे सखोल तपास करून आरोपीच्या वास्तव्याबाबत (लोकेशन) उचित माहिती प्राप्त करून आरोपीस हैद्राबाद येथून शिथापीने ताब्यात घेतले.

आरोपीत इम्रानअली फैजअली खान याच्या सखोल चौकशी मध्ये त्याचा दाखल गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली. चौकशीमध्ये आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याचे व त्याच्या विरुध्द भारतामध्ये अनेक गुन्हे दाखल असल्याचे दिसून आले.

<u>अटक आरोपीताचा गुन्हे अभिलेख खालील प्रमाणे</u>

१) चंचलगुडा पोलीस ठाणे, हैद्राबाद गुरक्र ३६४/२००८ कलम १४७, ३२४, ४२७, ३८२ भादवि.
२) चंचलगुडा पोलीस ठाणे, हैद्राबाद गुरक्र ३६६/२००८ कलम १४७, १४९, ३०२, ३२४, ३२४, ४२७, १५३(अ) भादवि
३) दाबेरपुरा पोलीस ठाणे हैद्राबाद गुरक्र ५८/२०११ कलम ३,४ ए.पी जुगार कायदा
४) दाबेरपुरा पोलीस ठाणे हैद्राबाद गुरक्र ९५/२०११ कलम ३,४ ए.पी जुगार कायदा
५) दाबेरपुरा पो ठाणे गुरक्र ५६/२०१२ कलम ३७६,३५४,५०६,१०९,१२०(ब), ३४ भादवि
६) दाबेरपुरा पोलीस ठाणे हैद्राबाद गुरक्र ६३/२०१६ कलम ३०७,३४ भादवि
७) दाबेरपुरा पोलीस ठाणे हैद्राबाद गुरक्र २७/२०११ कलम ३०७,३४ भादवि
८) दाबेरपुरा पोलीस ठाणे हैद्राबाद गुरक्र ५८/२०१५ कलम ३४२, ३८४, ३४ भादवि

तसेच अटक आरोपी हा खालील नमुद गुन्हयामध्ये पाहीजे आरोपी असल्याचे दिसून आले.

१) गंगाखेड पोलीस ठाणे, परभणी, महाराष्ट्र गुरक्र ३१७/२०२२ कलम ४९८(अ)भादवि

२) गंगाखेड पोलीस ठाणे, परभणी, महाराष्ट्र गुरक्र ४२९/२०२३ कलम ४२०, ४०६, ३४ भादवि

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त मा. अभिनव देशमुख सो., मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २, मा. डॉ मोहितकुमार गर्ग सो., मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग, श्रीमती ज्योत्सना रासम यांच्या मार्गदशनाखाली पायधुनी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. बाळकृष्ण देशमुख सो., पोलीस निरीक्षक श्री. नितीन पगार (गुन्हे), पोलीस उप निरीक्षक अनिल वायाळ, पो.ह कैलास भोईटे, इरफान खान, दिपक निकम व परब (व्ही.पी रोड पोलीस ठाणे) तसेच पो शि.शंकर राठोड, नितेश घोडे, प्रकाश अलदर व विलास पाडवी यांनी केली आहे.

नागरिकांना मुंबई पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणी online cyber माध्यमाद्वारे संपर्क केल्यास त्याबाबत योग्य पडताळणी करावी व त्याद्वारे फसवणुक होणार नाही याची दक्षता घ्यावी व असा प्रकार निदर्शनास येताच त्वरीत मुंबई पोलीसांशी संपर्क करावा.